710

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन क्रांती चौक, औरंगाबाद शहर

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** क्रांति चौक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0180 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/05/2024 22:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 31/05/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/05/2024
**Time From (वेळेपासून):** 13:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/05/2024 **Time (वेळ):** 21:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 051

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/05/2024 21:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1.05 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सह उपनिबंधक कार्यालय ,निराला बजार, छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आशिष मदनकुमार इंगळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मयुरपार्क, बी-1/02, देवगिरी , बँकेजवळ, हर्सुल टि पईंट ,छत्रपती संभाजीनगर ,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मयुरपार्क, बी-1/02, देवगिरी , बँकेजवळ, हर्सुल टि पईंट ,छत्रपती संभाजीनगर ,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8668695158

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भारत किसनराव जारे | | | 1. पायलट बाबानगरी N-2 , सिडको मुकुंदवाडी,छत्रपती संभाजीनगर ,क्रांति चौक, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

आज रोजी फिर्याद दिल्याने

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अँथ्रासिन पावडर लागलेले रोख रक्कम | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 31/05/2025
लाप्रवि छत्रपती संभाजीनगर

मी आशिष मदनकुमार इंगळे, वय-34 वर्षे व्यवसाय-खाजगी नोकरी,रा. मयुरपार्क, बी-1/02, देवगिरी बँकेजवळ, हर्सुल टि पॉईट ता.जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 8668695158 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 30/05/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी  हजर येवुन पोलीस उपअधीक्षक, श्री गोरखनाथ गांगुर्डे, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर यांचे व पंचासमक्ष लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे,
समक्ष कार्यालयात हजर राहून तक्रार अर्ज देतो की, मी व इतर सदस्य यांनी न्यु सम्यक मागासवर्गीय औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था स्थापन केलेली आहे. सदर संस्था हि हेतुपुरस्कर माननिय उपनिबंधक तालुका स्तर औरंगाबाद यांनी अवसायनात काढली असल्यामुळे सदरील संस्था अवसायनातुन बाहेर काढण्याकरीता सदरील कार्यालयात रितसर विनंती अर्ज सादर केला व त्यानुसार मा.बी.के. झुंजारे यांची अवसायक अधिकारी म्हणून संबंधित कार्यालयाकडून नियुक्ती करण्यात आली. मा. झुंजारे यांनी त्यानुसार दिनांक 30/05/2024 रोजी संस्थेच्या सभासद व संचालक मंडळ यांची बैठक घेतली व पुढिल कारवाईसाठी झुंजारे यांनी माझ्याकडे 50,000/- रु इतक्या रकमेची मागणी केली. मला त्यांना सदर कामाकरीता कोणतेही पैसे लाच म्हणून दयायचे नाहीत व सध्या माझ्याकडे इतके पैसेही नाहीत म्हणून मी मा. बी.के. झुंजारे व लिपीक श्रेणी -2 यांच्याविरुध्द तक्रार देत आहे. तक्रारीप्रमाणे श्री. झुंजार यांनी स्वत: किंवा इतरांच्या मदतीने माझ्याकडे पैशाची मागणी करुन ती स्विकारल्यास त्यांच्याविरुदध कायदेशिर कारवाई करावी. माझे व झुंजार यांचे आपसात कोणतेही व्यवहारीक अथवा उसनवारीची देवाण-घेवाण नाही किंवा आमचे आपसात कोणतेही वैमनस्य नाही. मी आज दि.30/05/2024 झुंजार यांची भेट घेण्याकरीता तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात जाणार आहे. त्याप्रमाणे पडताळणी करुन कारवाई करावी हि नम्र विनंती. अशी तक्रार दिली होती.
माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उपअधीक्षक श्री गोरखनाथ गांगुर्डे यांनी दिनांक 30/05/2024 रोजी त्यांचे सापळा पथक व हजर असलेले शासकिय पंच क्र.1 श्री.आशिष अशोक धुमाळ वय 32 वर्ष पद- कनिष्ठ लिपीक, महानगर पालिका कार्यालय, वॉर्ड क्र.2. छत्रपती संभाजीनगर रा.उस्मानपुरा गोपाल टि जवळ, छत्रपती संभाजीनगर मो.8669695949 पंच क्र.2. श्री.मनोज बाबुराव गुडेकर वय 40 वर्ष पद- मजुर, महानगर पालिका कार्यालय, वॉर्ड क्र. 2. छत्रपती संभाजीनगर, रा. लक्ष्मीनगर गल्ली नं.2 न्यु हायस्कुल शाळेसमोर, हर्सुल छत्रपती संभाजीनगर मो. 7020970708 असा आमचा ओळख परिचय करुन दिला. ओळख परिचय झाल्यानंतर पोउपअ/ श्री गोरखनाथ गांगुर्डे यांचे समक्ष दोन्ही शासकिय पंचांना माझी दिलेली हस्तलिखीत व स्वस्वाक्षरीत तक्रार दोन्ही पंचांना दाखवुन वाचन केले. त्यानंतर माझ्या लेखी तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केल्या. माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पोउपअ/ श्री गांगुर्डे यांनी पंच व सर्वानुमते उपनिबंधक तालुका स्तर कार्यालय निराला बाजार छत्रपती संभाजीनगर येथे सहकारी अधिकारी श्री झुंजारे यांचे कडे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला व आम्हाला

योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर सुरक्षीत ठिकाणाहुन माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पंच क्र. 1 आशिष अशोक धुमाळ यांना सोबत घेवुन रवाना केले. मी व पंच क्र.1 माझे खाजगी चारचाकी एम एच.20 बि वाय 1691 मारुती झेन या गाडीने उपनिबधक कार्यालय निराला बाजार छत्रपती संभाजीनगर येथे गेल्यानंतर तेथे सहकारी अधिकारी श्री भारत झुंजारे आम्हाला भेटले. त्यावेळी माझ्या सोबत असलेल्या पंचांना पाहुन त्यांचे बाबत विचारणा केली. त्यावेळी आमच्या चर्चा दरम्याण कामासबधाने चर्चा होऊन त्यांनी 50,000/- रुपये मागणी केल्याप्रमाणे तडजोडी अंती 30,000/- रुपये लाचमागणी केली व दिनांक 31/05/2024 रोजी सकाळी कार्यालयात आणुन देण्याबाबत सांगीतले व 30,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले.
त्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो. त्याठिकाणी सापळा अधिकारी श्री पोउपअ/ गोरखनाथ गांगुर्डे यांना पंच क्र.1 यांनी व मी सदर ठिकाणी घडलेली सर्व हकिगत सांगितली व गोरखनाथ गांगुर्डे, पोलीस उपअधीक्षक यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले त्यात आम्ही सांगीतल्याप्रमाणे व माझ्या तक्रारीत नमुद प्रमाणे श्री झुंजारे यांनी लाच मागणी केल्याचे व लाच रक्कम दिनांक 31/05/2024 रोजी घेऊन येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे पोउपअ/श्री गोरखनाथ गांगुर्डे व सर्वानुमते दिनांक 31/05/2024 रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले.

दिनांक 31/05/2024 रोजी पोउपअ/श्री गोरखनाथ गांगुर्डे यांचे सुचनेनुसार सकाळी ला.प्र.वि. कार्यालयात हजर आलो असता सापळा कारवाईच्या वेळी सहकार अधिकारी श्री भारत झुंजारे यांना लाच म्हणुन देण्याकरिता आवश्यक असलेले 30,000/-रुपये बाबत पोउपअ/गोरखनाथ गांगुर्डे यांनी विचारणा केली असता माझ्याकडे लाच म्हणुन देण्याकरिता आणलेले 10,000/- रुपये ज्यात 500/-रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा, पोउपअ/ श्री गोरखनाथ गांगुर्डे यांचे समक्ष हजर केल्या व 20,000/- रुपयांची पुर्तता झाली नसल्याने श्री झुंजारे यांना 10,000 /- रुपये देण्याचे मी कळविले त्याप्रमाणे सदर नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेऊन त्यांनी चालक पो. अंम./ चांगदेव बागुल यांचे कडुन नोटांना ॲन्थ्रोसिन पावडर लावुन 500 दराच्या 20 नोटांचा एक घडी तयार करुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्र. 1 आशिष धुमाळ यांचेसह सहकार अधिकारी श्री भारत झुंजारे यांचे भेटीकरिता सुरक्षीत ठिकाणावरुन माझे खाजगी चारचाकी वाहनाने रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 आशिष धुमाळ असे सोबत जाऊन उपनिबंधक कार्यालय, निराला बाजार येथे सहकारी अधिकारी श्री भारत झुंजारे यांना भेटलो व त्यांना फोनवर म्हणालो की, झुंजारे सर खाली आलो होतो, तुम्ही खाली येता का मी वर येऊ असे म्हणालो असता त्यांनी मला कार्यालयाचे स्टोअर रुममध्ये बोलावुन घेतले, तेव्हा ते मला म्हणाले की ऐवढे होते तर कालपासुन कशाला फिरवले तेव्हा मी त्यांना हो कालपासुन ॲडजस्टमेंट चालु आहे असे सांगीतले तर माझ्या पॅंटच्या समोरील खिशातील लाचेची रक्कम काढुन समोर धरली असता त्यांनी मला त्यांच्या कार्यालयातील उत्तरेकडील फाईलच्या गठठयाकडे इशारा करुन भिंतीलगत असलेल्या फाईलच्या गठठयावर ठेवण्यास सांगीतले असता मी त्यांना कुठे ठेऊ , इथे ठेऊ का ? असे विचारले असता त्यांनी त्यांच्या उजव्या हाताचा इशारा करुन दया ठेवुन तेथे ! असे म्हणाले असता मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिश्यातुन उजव्या हाताने 10,000/-रुपये काढून श्री झुंजार यांनी सांगीतलेल्या ठिकाणी लाचेची रक्कम ठेवली. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर पुर्वनियोजीत इशारा मी 13.38 मिनिटांनी लगेचच सापळा अधिकारी श्री गांगुर्डे यांना माझ्या मोबाईल वरुन मिस कॉल दिला तेव्हा सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच क्र. 2 असे घटनास्थळी हजर आले व आरोपी लोकसेवक श्री भारत झुंजारे यांनी सांगण्याप्रमाणे पिवळया रंगाच्या फाईलवर लाचेची रक्कम ठेवण्यास सांगीतली होती ती तेथेच होती. तेव्हा पोलीस उपअधीक्षक श्री गोरखनाथ गांगुर्डे यांनी संपुर्ण सापळा पथक व पंच यांचा परिचय दिला व लाचेची रक्कम काढण्याच्या सुचना दिल्या असता त्याने लाचेची रक्कम कार्यालयातील स्टोअर रुमच्या कक्षात उत्तरेकडील भिंतीजवळ पिवळया रंगाच्या फाईलवर ठेवल्याचे सांगीतले होते असे सांगुन लाचेची रक्कम कोठे ठेवली आहे ती सर्वासमक्ष दाखविली.
पंच क्र.1 यांनी पोलीस उपअधीक्षक श्री गांगुर्डे यांना श्री भारत झुंजारे यांनी तक्रारदार यांचे कडुन घेतलेले लाचेचे पैसे कार्यालयातील पिवळया रंगाच्या फाईलवर ठेवण्याचे सांगीतले होते असे सांगितले. त्यानुसार श्री भारत झुंजारे यांनी पैसे त्या ठिकाणी ठेवण्यास सांगीतले होते त्या पिवळया फाईलवरुन श्री भारत झुंजारे यांचे समक्ष ताब्यात घेऊन ते को-या कागदावर धरुन पंच क्र.2 यांचे मदतीने जागीच अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म तपासले असता सापळा पुर्व कारवाईत मी हजर केलेल्या नोटांवर व पिवळया फाईलच्या अधवट तुकडयावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली व मी सादर केलेल्या नोटांप्रमाणे तंतोतंत क्रमांक जुळले.

संपुर्ण पंचनामा सदर ठिकाणी करणे शक्य नसल्याने पोलीस उपअधीक्षक श्री गांगुर्डे यांनी ती रक्कम को-या कागदामध्ये आहे तशी पंच क्र.2 यांचेकडे देवुन आरोपीतास ताब्यात घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे पंचनामा करण्याचे ठरल्याने मी सापळा पथक ,आरोपी व पंच असे सरकारी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे आलो. पोलीस उपअधीक्षक श्री गोरखनाथ गांगुर्डे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे सविस्तर पंचनामा केला आहे.

तरी दिनांक 31/05/2024 रोजी 13.38 वाजेच्या सुमारास सहकार अधिकारी श्री भारत झुंजारे यांनी माझी न्यु सम्यक मागासवर्गीय औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था उपनिबंधक तालुका स्तर औरंगाबाद यांनी अवसायनात काढली असल्यामुळे सदरील संस्था अवसायनातुन काढण्याकरीता माझ्याकडे स्वत:चे गैरलाभासाठी लाच म्हणुन 50,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोड करुन 30,000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व त्यापैकी 10,000/- रुपये लाच रक्कम पंचसाक्षीदार समक्ष स्विकारली आहे व उर्वरित 20,000/- रुपये माझा भाऊ आल्यानंतर त्यांच्याकडुन घ्यावेत असे सांगीतले असता ते 20,000/- रुपये स्विकारण्यास संमती देऊन मला माझे व्यवस्थित करुन द्या असे म्हणुन पुन्हा लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद /तक्रार आहे.

माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये **नमूद** केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sunil baburao mane(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम** खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

कर्तव्य अधिकारी
पोलीस ठाणे क्रांतीचौक
औरंगाबाद शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sunil baburao mane
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi